**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ६१ खालील आदेश.**
**रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर**
**आदेश पारित दिनांक १०.०७.२०२३**

---

वादींनी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ६२ वर अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे हे दिनांक २४.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्याच्या पुष्ठ्यर्थ वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांच्या मृत्यू उताऱ्याची प्रमाणित प्रत नि.क्र. ६६ वर अभिलेखावर दाखल केली आहे. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरिता सदर मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला व त्याचेविरुध्द ॲबेटमेंटचा हुकूम झाला आहे त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली.

**०३.** सदरकामी, प्रतिवादी यांनी हे म्हणणे दाखल केले आहे की, वादीचे अर्जातील कथने व विधाने खोटी व लबाडीची आहेत. सदरकामी अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द होणेकामी वादीने स्पष्ट कारणे दिलेली नाहीत. तरी अर्ज नामंजूर व्हावा, ही विनंती केली आहे.

**०४.** अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे योग्य वाटते. तसेच, मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा

(abatement) हुकूम रद्द करणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादींचा निशाणी क्र. ६१ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टात आल्याचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिनांकः- १०.०७.२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.